Review Of Research
Vol. 4 | Issue. 2 | Nov. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X
Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# वाशिम जिल्हयाची सोयाबीन शेती व अर्थव्यवस्था

**प्रा. वसंत व्हि. आरू**

**सहा. प्राध्यापक , वाणिज्य विभाग ,**
**श्री रामराव झनक कला व वाणिज्य महाविद्यालय मालेगांव ता.मालेगांव जि. वाशिम.**

**प्रस्तावना :-**

भौगोलिक दृष्टीने वाशिम जिल्हा महाराष्ट्राच्या मध्यपूर्वेक वसलो असून उत्तर अक्षांस १९.६१ ते २१.१६ आणि रेखांश ७६.१४ अक्षाच्या दरम्यान पसरलेला आहे. जिल्हयाचे एकूण क्षेत्रफळ ५१९६ चौ. कि. मी असून महाराष्ट्राच्या १.६५ टक्के क्षेत्र जिल्हाने व्यापलेले आहे. १ जुलै १९९८ रोजी अकोला जिल्हयाचे विभाजन करून वाशिम जिल्हयाची निर्मीती करण्यात आली. जिल्हयामध्ये एकुण ६ तालुके, ४ नगरपालीका, ६ पंचायत समित्या व ७८९ खेडी आहेत. हया जिल्हयाच्या सीमेचा विचार करता उत्तरेला अकोला जिल्हयाचा  पातुर तालुका पूर्वला यवतमाळचा दारव्हा , दक्षिणेला, पुसद तसेच हिंगोली व पश्चिमेला बुलढाण्याचा लोणार व मेहकर  तालुक्याच्या सीमा जोडलेल्या आहेत. जिल्हयातील मुख्य नद्या म्हणून पैनगंगा. काटेपुर्णा , मोरना, अडान, अरूणावली व बेंबळा हया प्रमुख नद्या आहेत.

जिल्हयाच्या जमीनीचा विचार करता मध्यम काळी कसदार व इलकी व खडकाच्या प्रकारची जमीन जिल्हयातील असून २८०७ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली असून ते ५.१९ % आहे. जिल्हयात एकही मोठा सिंचन प्रकल्प नसला तरी अडान , एकबुर्जी व सोनल हे तीन मध्यम प्रकल्प, तसेच ६१ लघु प्रकल्प, ९५ पाललोट योजना प्रकल्प व १६८ कोल्हापूरी बंधारे आहेत. या प्रकल्पाच्या माध्यमातून ५४३.६४ हेक्टर क्षेत्र सिंचीत होत आहे. तसेच शासकीय व सहकारी दुग्धशाळा जिल्हयात नसल्या तरी १८० दुग्ध विकास सहकारी संस्था आहेत.

**दर हेक्टर उत्पादन :-**

| अ.क्र. | पिकाचा प्रकार | हेक्टरी उत्पादन | एकूण उत्पादन | २००९-१० शेकडा वाढ |
|---|---|---|---|---|
| १ | तृणधान्य | १५५५kg | ६३४ मे. टन | + १०४.५% |
| २ | गहू | ११६७kg | २५० मे. टन | -३४.५% |
| ३ | ज्वारी | | | |
| ४ | कडधान्य | १०८८kg | ८५७ मे. टन | +२.६७% |
| ५ | हरभरा | ७२३kg | ४५९मे. टन | १७.५९% |
| ६ | उडिद | ७२६ kg | २५९ मे. टन | ५३.६६% |
| ७ | मुग | ५३९ kg | १८५ मे. टन | ६०.३०% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | कापूस | ९९८ kg | ६३३ मे. टन | ५७.५७% |
| ९ | सोयाबीन | १४४४kg | २९६८ मे. टन | ११.१३% |

वरील तक्त्याचा विचार करता जिल्हयात तृणधान्य, कडधान्य सोबतच कापूस, सोयाबिनचे उत्पादन घेतले जोत. गव्हाचे हेक्टरी उत्पादन १५५५ kg असून ६३४ मे .टन जिल्हयात होते. ज्वरी १६६७ kg हेक्टरी उत्पादन असून २५० मे.टन उत्पादन होत आहे. तर कडधान्य तर कधधान्याचा विचार करता, हरबर, तुर, उडिद , मुगाचे अनुक्रमे १०८८ kg, ७१९kg, ५३९kg हेक्टरी उत्पादन होत असून एकून उत्पादन अनुक्रमे ८५७ मे.टन. ४५९ मे.टन. , २५९ मे.टन व १८५ मे.टन निघत आहे. तसेच जिल्हयातील कापूस उत्पादनाचा विचार करता हेक्टरी ९९८ kg उत्पादन होत असून एकूण ६३३ मे.टन उत्पादन घेतल्या जाते. वरील सर्व पिकांच्या व्यतिरिक्त जिल्हयात सोयाबनिचा विचार केला तर सोयाबिनचे सरासरी उत्पादन १४४४ kg होत असून एकूण २९६८ मे.टन. उत्पादन होत आहे. वैश्ष्टिपूर्ण बाब म्हणजे सर्व उत्पादनाचा विचार करता १०४.५% नी गव्हाणचे उत्पादन हेक्टरी ९९८ kg उत्पादन होत असून एकूण ६३३ मे.टन उत्पादन घेतल्या जाते. वरील सर्व पिकांच्या व्यतिरिक्त जिल्हयात सोयाबिनचा विचार केला जतर सोयाबिनचे सरासरी उत्पादन १४४४ kg होत असून एकूण २९६८ मे.टन उत्पादन होत आहे. वैशिष्टपूर्ण बाब म्हणजे सर्व उत्पादनाचा विचार करता १०४.४५% नी गव्हाचे उत्पादन वाढत असलेले दूिसन येते परंतु ज्वारी ३४.५% नी घटलेले आहे. हरभऱ्याचे उत्पादन २.६७ % वाढले असून तर १७.५९% उडिद ५३.६६ मुग ६०.३०% नी घटलेले आहे. कापूस पिकाबाबतही उत्पादन ५७.५७% कमी झालेले आहे. परंतु सोयाबिनचा सर्व अंगानी विचार केला असता सोयाबिनचे प्रतिहेक्टरी उत्पादन जिल्हयात इतर पिकाच्या तलनेत सर्वाधिक असून एकूण उत्पादन सुध्दा २९६८ मे.टन म्हणजे जिल्हयाचे असलेले हवामान २५ ते ३३ अंश सेल्सीयस, ७०० ते १००० मी.मी. पर्जमान्य व पाण्याचा निचरा होणारी जमीन, सोयाबीन पीकास पोषक ठरणारी आहे. हे स्पष्ट होते. तज्ञाच्या अंदाजानुसार अजूनही हे हेक्टरी उत्पादन २३ ते ३० क्विंटल होणे शक्य असल्याचे मत आहे.

**पिक पेरणी क्षेत्र (हेक्टर)**

| पिक | सरासरी क्षेत्र | प्रमाण | प्रत्यक्ष पेरलेले क्षेत्र | सरा क्षेत्राशी प्रमाण | प्रत्यक्ष पेरलेल्या अंगाचे एकूण क्षेत्राशी प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|
| तृणधान्य भात , बाजरी , ज्वारी ,मका | ५२६०० | १२.१४% | १६०१५ | ३०.४४% | ३.९९% |
| सर्वाधीक ज्वारी | ५०४०० | ११.६३% | १४९८१% | २९.१२% | ३.७३% |
| कडधान्य तुर,मुंग, उडिद | १३०३०० | ३०% | ७२३१३ | ५५% | १८% |
| पैकी सर्वाधिक तुर | ४९००० | ११.३१% | ४६१८३ | ९४.२५% | १.१५% |
| कापूस | ६६५०० | १५.३५% | ३४५११ | ५१.८९% | ८.५९% |
| उस | ८०० | ०.१८ | २१३ | २६.६२% | ०.०५% |
| गळीतधान्य भुईमुंग,तीळ, | १८३२०० | ४२.२९ | २७८३४४ | १५१.९३% | ६९.३४% |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सुर्यफळ,सोयाबीन | | | | | |
| पैकी सोयाबिन | १८१३०० | ४२.३०% | २७६३४५ | १५२.४२ | ६८.८४% |
| एकूण | ४३३१०० | १००% | ४०१३९६ | ९२.६७% | ९२.६७% |

वरील तक्तयावरून असे लक्षात येते की,

वाशिम जिल्हयामध्ये साधरणात: एकूण पेरणी क्षेत्रापैकी म्हणजे ४३३१०० हेक्टर पैकी ५२६०० हेक्टर मध्ये तृणधान्य घेण्यासाठी योग्य जमीन आहे. परंतु केवळ १६०१५ हेक्टर जमीनच तृणधान्यसाठी वापरली जाते. म्हणजे ३६५८५ हेक्टर ६९.५३% जमीन ही इतर पिकासाठी वापरली जाते. यामध्येही सर्वाधिक क्षेत्र ज्वारी साठी वापरले जाते. त्याचे प्रमाण २९.१२ आहे.

१. कडधान्य विचार करता १३०३०० हेक्टर जमीनीचे क्षेत्र हयासाठी पोषक असले तरी केवळ ७२१३ हेक्टरचाच कडधान्यासाठी वापर केल्या जातो. म्हणजेच ४५% जमीनीचे क्षेत्र हे इतर पिकासाठी वापरले जाते पैकी तुरीने आपेल क्षेत्र कायम ठेवले आहे.
२. कापूस या पिकाचे क्षेत्र सुध्दा ४८% क्षेत्र कमी झालेले दिसून येते.
३. ऊस तर जिल्हयात जो पहिलाच अल्प होता. आत ते अत्यल्प, नसल्यासारखे त्यचे क्षेत्र झाले आहे.
४. गळीत धान्याची मात्र वेगळी स्थिती आहे. हयाचे जिल्हयात क्षेत्र १८३०० हेक्टर असले तरी २७८३४४ हेक्टर जमीनीचे क्षेत्र गळीत धान्याने व्यापले आहे. त्याही केवळ सोयाबिन हया पिकाचे सर्वाध्िाक म्हणजे १५३% क्षेत्र व्यापले आहे. म्हणजेच वरील सर्व तृणधान्य, कडधान्य, कापूस, उस हयोच जे क्षेत्र कमी झाले आहे. ते सर्व क्षेत्र सोयाबिनने व्यापलेले आहे.आज जिल्हयाचा एकूण ४०१३९६ हेक्टर प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्रापैकी २७६३४५ हेक्टर जमीनीच्या क्षेत्रात सोयाबिन उत्पादन घेतले जाते. म्ळणजेच जवळपास ६९% क्षेत्र सोयाबिन ने व्यापले आहे. थोडया फार प्रमाणात ज्वारी स्थीर असली तरी उडीद , मुग,बाजारी, मका, कापूस, उस, सुर्यफल हे पिक संपल्यात जमा असल्याचे दिसून येते, सर्व सोयाबिन शेतीच दिसते.

देशाच्या दृष्टीकोणातून विचार केला तर मध्यप्रदेश ४० ला हेक्टर, महाराष्ट्र १६ लाख हेक्टर व राजस्थान ५ लाख हेक्टर जमीन सोबनि पिकासाठी वापरली जाते या तीन राज्य मिळून देशतील ९६ % सोयाबिन उत्पादन होते. महाराष्ट्राच्या सर्व जिल्हयापैकी विाशम हया एका जिल्हयात कएूण राज्याच्या १६ लाख हेक्टरी जमीनीपैकी २७६३४५ हेक्टरी जमीन सोयाबिन साठी वापरली जाते. म्हणजे राज्यात १५% क्षेत्र केवळ वाशिम जिल्हयाचे आहे. म्हणजेच १५% सोयाबिन उत्पादन केवळ वाशिम जिल्हयातून महाराष्ट्रात होते.

एवढया प्रमाणावर सोयाबिनचे उत्पादन होवून सुध्दा मोठया प्रमाणावर शेतकरी आत्महत्या (दि. ०८/०६/२०१३ ) नुसार १०१५ हयाच जिल्हया आहेत. विदर्भातील एक मागसलेला जिल्हाही वाशिमच आहे असे का ? हयाचाही विचार करणे गरजेचे आहे.

बियाणाच्या दृष्टीने सोयाबिनचा विचार केला तर बियाणांच्या सोयाबिनला प्रतिक्विंटल ६०० रू. अतिरिक्त भाव मिळतो. देशात ३३ लाख क्विंटल बियानांची गरज वर्षाला असते. महाराष्ट्र आवश्यक बियाणापैकी केवळ २० ते २५ % बियाणाचे उत्पादन केल्या जाते. म्हणजेच ७५% ते ८०% बियाणांची मध्यप्रदेशातून मागणी केली जाते. मध्यप्रदेशात त्यासाठी २ लाख हेक्टर क्षेत्र बिजउत्पादनासाठी वापरले जाते. मोठया प्रमाणात हयामाध्यामातून नफा मध्यपदेशाला मिळतो.

वाशिम जिल्हयातील शेतीचा अभ्यास करता असे लक्षात येते की, ८५ ते ९० % शेतकरी बिजोत्पादन तंत्र आत्मसात केलेला शेतकरी आहे. त्यामुळे वाशिम जिल्हयातून २३.८० लाख क्विंटल बियाणे हया जिल्हयातून उत्पादीत होऊ शकते. साहजीकच त्यामुळे २३.८० लाख x ६०० रूपये एवढा अतिरिक्त नफा वाशिम च्या शेतकऱ्याला मिळू शकतो. त्याचप्रमाणे देशाच्या ३३ लाख क्विंटलच्या एकूण मागणी पैकी २४ लाख क्विंटल बियाणाची उत्पादन निर्मीती केवळ एक वाशिम जिल्हा करू शकतो पण हया सर्व बाबकीकडे दुर्लक्ष होत आहे. ही वास्तविकता आहे.

त्याचे कारण असे की, संपूर्ण जिल्हयसात महाबिजाच्या माध्यमातुन केवळ, ४ वैयक्तिक शेतकऱ्यांच्या माध्यमातून १८ व बिजोउत्पादन प्रकल्प आहेत व १० प्रकल्पासाठी अनुदान दिल्याची माहिती मिळते पंरतु हयामध्ये मोठया प्रमाणात वाढ होण्याची गरज आहे.

दुसरे असे की, जगात घरोघरी आज आहारात सोयाबीनचा वापर होत आहे. वरण , पोळी, इडली, डोसा, ठोकळा पीठले आदि साठी सोयाबीचा वापर केल्या जातो. मांसाहारात असलेली सर्व प्रथीने सोयाबिनमध्ये आहेत. सोयादुध, सोयापन्नीर , सोयाब्रेड, सोयाबिस्कीट, सोयालाडू असे नेक खाद्य पदार्थ, जेव्हा सोयाबिन पासून निर्माण केल्या जातात. परंतु वाशिम सोयाबिनचे कोठार असून सुध्दा हया उद्योगापैकी २ तेल उद्योग सोडले तर कोणत्याही पदार्थाचे उत्पादन जिल्हयात होतांना दिसत नाही.

**सारांश :-**

जिल्हयाच्या विकास करावयाचच असेल तर जिल्हयाची शेती बिजोत्पादन करण्यास पोषक असल्यामुळे येथील शेतकऱ्यांना ते अवगत असल्यमुळे बिजोत्पादन जिल्हयात तयार होण्यासाठी शासनाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्याच बरोबर पश्चीम महाराष्ट्रा प्रमाणे वाशिमध्ये सुध्दा प्रक्रिया उद्योग कसे निर्माण करता येतील याकडे ही लक्ष देणे गरजेचे आहे. तरच या वाशिम जिल्हयाचा विकास होऊन शेतकरी आत्महतेचे सत्र थांबेल व हा जिल्हा सोयाबीन उत्पादनाचे कोठार आहे याचा अभिमान वाटेल.